॥ राष्ट्रदेवाः भवेम ॥


# ज्ञान प्रबोधिनी
# शैक्षणिक साधन केंद्र

## ई - प्रशिक्षक

वर्ष २ : अंक ८ / मे २०१५







मातृभूमी परिचय शिबिर : संकल्पना



मातृभूमी परिचय शिबीर : एक अनुभव




Jagriti Yatra



# संपादकीय

सस्नेह नमस्कार

'केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार ! याने येते मनुजा चातुर्य फार!
या अर्थाचे सुभाषित लहानपणी वाचल्याचे  आठवते. अध्ययनाचे तीन मार्ग येथे सांगितले आहेत. या अंकात देशाटनाचे महत्त्व सांगणारे लेखन आपल्याला वाचायला मिळेल. मातृभूमी परिचय व्हावा म्हणून देशातील विविध भागांत मुलांना घेऊन जाणाऱ्या शिक्षकांचे अनुभव आहेत.

स्वतःच्या परिसरापासून  सुरुवात करत क्रमाने आपला जिल्हा, राज्य आणि देश पाहावा यासारखे शिक्षण नाही. पुस्तकात वाचलेले वनस्पती –प्राणी जीवन, लोक जीवन प्रत्यक्ष अनुभवता आले तर त्याबद्दलची नुसती समजच वाढणार नाही तर आत्मियता निर्माण होईल. नैसर्गिक आणि मानवी जीवनातील साम्यस्थळे आणि फरकही लक्षात येतील. कोणत्या अशा अदृश्य रज्जूंनी हे राष्ट्र एकत्रित रित्या बांधले गेले आहे. हे लक्षात येईल. ज्ञानप्रबोधिनी निगडीच्या गुरुकुलातील विद्यार्थी प्रतिवर्षी हा अनुभव चढत्या श्रेणीने घेत असतात. मुंबई मधील बांद्रे येथील म.गांधी विद्यालयातील मुलांनी अवघ्या दीडशे किलोमीटरवर असलेले पुणे वेगळया दृष्टीने कसे पाहिले याची गोष्ट अभ्यासण्यासारखी आहे. अभ्यासविषयात मुरलेल्या एखाद्या ऋषीतुल्य शिक्षकाच्या नजरेतून नेहेमी दिसणाऱ्या गोष्टी वेगळ्या कशा दिसतात हेच प्र. के. घाणेकर सर आणि मोहन शेटये सरांच्या उदाहरणांवरून दिसून येते.

वय आणि अनुभव थोडे वाढले की मग सुगत दाभोळकरांनी लिहिलेल्या लेखातील शोधयात्रा करता येते. 'सृष्टी' या संस्थेच्या पुढाकाराने प्रतिवर्षी होत असलेल्या शोध यात्रेत आपल्या समाजाचा वेगळाच परिचय होतो. आडवाटेच्या ग्रामजीवनात दडलेली प्रतिभा अचानक समोर येते. हजारो वर्षांचे परंपरागत ज्ञान कोणा बुजुर्गांच्या मुखातून प्रगट होते. अशा शोध यात्रेत सृष्टी आणि समष्टीच्या शोधाबरोबरच स्वतःचा शोध लागणाऱ्या संधीही निर्माण होत असतात. म्हणूनच अशा देशाटनाला शिक्षणामधे महत्त्वाचे स्थान असले पाहिजे.

**विवेक पोंक्षे**

## ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, गुरुकुल, निगडी.

गुरुकुलामध्ये गेली १९ वर्षे अव्याहतपणे चालू असलेला अतिशय महत्वाचा उपक्रम म्हणजे मातृभूमी परिचय शिबिर ! आसेतूहिमाचल पसरलेल्या विशाल मातृभूमीविषयी मनामध्ये प्रेम निर्माण होणे हा या शिबिराचा मुख्य हेतू. या देशातील कानाकोपऱ्यात नांदत असलेल्या परंपरा, इतिहास, भूगोल, लोकजीवन, राजकीय, प्रशासकीय जीवन, या सगळयाचा जवळून परिचय होणे अभिप्रेत असते.पुस्तकांच्या चौकटीमधून यातले काही संदर्भ मुले अभ्यासत असतात.परंतु प्रत्यक्ष अनुभव घेतल्याने या सगळयाकडे बघण्याचा दृष्टीकोन विकसित होत असतो. इथल्या मातीविषयी, माणसांविषयी,परंपरांविषयी आपुलकी निर्माण होत असते.त्यातूनच मनामध्ये देशांविषयीचा सार्थ अभिमान तयार होण्यास मदत होते.

या सगळयाबरोबरच स्थानिक भागातले प्रश्न,अडचणी,समस्या,मर्यादांचा परिचय होत असतो. या प्रश्नांवर गटात चर्चा करणे,आपले मत मांडणे, इतरांची मते ऐकून घेणे,अशा प्रकारची अनेक कौशल्ये मुलांची विकसित होत असतात. त्या त्या ठिकाणी काम करणारे स्थानिक कार्यकर्ते व्यक्तीपरिचयातून मुलांना भेटत असतात.यामुळे देशातील प्रश्नांकडे नकारात्मक दृष्टीकोनातून न बघता, अभ्यासाने,प्रयत्नांनी, नि:स्वार्थपणे काम केल्याने प्रश्न सुटू शकतात हे मुलांच्या ध्यानी येते. अशा व्यक्तिपरीचयांमधून जिद्द, चिकाटी, तळमळ, प्रामाणिकपणा, जवाबदार वर्तन, प्रतिसादी वृत्ती अशा गुणांचा जवळून परिचय होत असतो. देशप्रश्न सोडविण्याची जवाबदारी माझी आहे अशी जाणीव निर्माण होण्यासाठीची ही चांगली सुरुवात ठरू शकते.

केवळ प्रसिद्ध व्यक्तिमत्वच नाहीत तर सामान्य माणसांशी झालेला संवादही अनेकदा विचार करायला लावणारा ठरू शकतो; म्हणूनच प्रवासात सहप्रवासी लोकांशी गप्पा,त्यांना आपल्या उपक्रमांची माहिती सांगणे अशा प्रकारचे संवाद होत असतात. लोकजीवनातील भाषा, सांस्कृतिक परंपरा, अन्न, व्यवसाय, समस्या इ. अनेक मुद्यांचा सहज परिचय होतो. देशाच्या सीमेवर जिद्दीन लढणारा सैनिक, देशाच्या सुव्यवस्था सांभाळणारा प्रशासकीय अधिकारी, कष्टाने शेती पिकविणारा शेतकरी, श्रमाने सुखसोयी पुरविणारा कामगार, स्वकर्तुत्वाने उभा राहिलेला उद्योजक, या आणि अशा असंख्य माणसांबद्दल आपुलकी निर्माण व्हायला या शिबिरांचा अतिशय उपयोग आहे.

माणसांप्रमाणेच इथला निसर्गाची आणि अन्य साधनसंपत्तीची समृद्धी जवळून पाहत असताना त्यांची संवर्धन आणि रक्षण करण्याच्या जवाबदारीचे भान यायला मदत होत असते. लगेच एखाद्या भेटीनंतर सर्व मुलांना हे भान येईल असे नाही परंतु त्या दिशेने चर्चा करणे शक्य होते.

गुरुकुलात आम्ही मानतो की मुख्यत: मनोमय कोशाच्या विकसनासाठी म्हणजे मनाच्या विकासासाठी या उपक्रमाची रचना केलेली आहे. मुख्य उद्दिष्ट हे मनामध्ये या देशाविषयी प्रेम निर्माण होणे हेच आहे. त्याबरोबरच बुद्धीच्या स्तरावरही काही प्रक्रीया घडत असतात असे लक्षात येते म्हणूनच शिबिर यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शकांनीही पुरेशी पुर्वतयारी करणे आवश्यक असते. मार्गदर्शकाचा स्वत:चा त्या भागाचा अनेक अंगांनी अभ्यास असायला लागेल. शक्य असल्यास मार्गदर्शकाने पूर्वतयारी दौरा करणे आवश्यक असते. मुलांच्या क्षमता लक्षात घेऊन स्थानिक स्थळ भेटी, व्यक्तिपरिचय, गटचर्चा या सगळयाचे नियोजन करायला लागेल. गुरुकुलात सलग सहा वर्षे ही शिबिरे होत असतात.त्यामुळे तालुका पातळी पासून सीमावर्ती भागापर्यंत आणि ग्रामीण, निमशहरी जीवनापासून ते शहरी जीवनापर्यंत अशा अनेक प्रकारच्या अनुभवांचे स्तर ठरविता आले आहेत. शालेय वयातील या सहा वर्षात असे अनुभव घेतल्याने वर उल्लेख केलेल्या मनाच्या आणि बुद्धीच्या अनेक क्षमता विकसित होऊ शकतात असा अनुभव आहे.

आद्य शंकराचार्यांपासून स्वामी विवेकानंदांपर्यंत अनेक संतांनी,देशभक्तांनी भारतभ्रमण केले. 'मातृभूमी हेच दैवत' या संस्काराची पायाभरणी शालेय वयात करण्यासाठी गुरुकुलात 'मातृभूमी परिचय शिबिर' योजले जात असते. आपणही असा प्रयोग आवर्जून करून पहावा.

**आदित्य शिंदे**

गुरुकुल

नवनगर विद्यालय,निगडी

.






## मातृभूमी परिचय शिबिरांमधून औपचारिक शालेय शिक्षणापलिकडील शिक्षण

* **शीर्षक** - ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी येथील पंचकोशाधारित गुरूकुलात होणाऱ्या मातृभूमी परिचय शिबिरांमधून मातृभूमीचा परिचय कसा होतो याचा अभ्यास करणे.

* **प्रास्ताविक** - विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणे हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. इ. 5 वी ते 10 वी या संस्कारक्षम वयामध्ये आपल्या मातृभूमीचा टप्प्याटप्प्याने परिचय करून घेण्यासाठी शिक्षणपद्धतीमध्येच अशी रचना करणे आवश्यक आहे.

* **मातृभूमी परिचय शिबिर संकल्पना** - सामान्यतः शिबिरांची स्थाने ग्रामीण भागात किंवा ग्रामीण भागांना जवळ असलेल्या निमनगरी भागात आयोजित केली जातात. तेथील गावांचा धार्मिक, ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक, सामाजिक दृष्टिकोनातून परिचय करून घेणे म्हणजे मातृभूमीचा परिचय करून घेणे.

विद्यार्थी आणि अध्यापक मिळून इ. पाचवी ते सातवी पर्यंतचा लहान गट 8 ते 10 दिवस आणि नववी ते दहावी चा मोठागट 12 ते 14 दिवस शिबिरस्थळी जाण्याची व निवासाची योजना केली जाते.

शिबिराना कालावधी हा प्रथम सत्र परीक्षेनंतर दीपावली सुटीपूर्वी किंवा नंतर योजला जातो. इ. पाचवी चे विद्यार्थी जिल्ह्यामध्येच तालुक्याच्या ठिकाणी शिबिरास जातात. इ. सहावी चे विद्यार्थी दुसऱ्या जिल्ह्यात शिबिरासाठी जातात. सातवीचे विद्यार्थी वेगवेगळ्या महसुली विभागात शिबिरासाठी जातात.

इ. 8 वी चे विद्यार्थी गटागटाने कार्यकर्ते म्हणून या तिन्ही शिबिरांमध्ये कार्यरत असतात.

इ. 9 वी चे विद्यार्थी महाराष्ट्राच्या सीमेलगतच्या राज्यांमध्ये जातात.

इ. 10 वी चे विद्यार्थी देशाच्या सीमावर्ती भागात शिबिरास जातात.

या सर्व शिबिरांमधून विद्यार्थ्यांनी गावभेटींमधून आणि व्यक्तींचा परिचयातून समाजाचे निरीक्षण करण्याचा अनुभव घेतला. उंचसखल भागातून, शेतांच्या बांधावरून, झाडा-झुडपांमधून, डोंगरदऱ्यांमधून, ओढे-नदी-नाल्यांमधून, किल्ल्यांवर पायी फिरल्याने मुलांना शरीर कष्टांचा अनुभव घेता आला. महत्वाच्या स्थळांना भेटी देऊन माहिती घेता आली. निसर्गातील अनेक गोष्टींचा स्पर्श, चव, गंध, रूप हे जवळून पाहता आले. स्वतःच्या इंद्रियशक्तींच्या क्षमता अनुभवता आल्या. विद्यार्थ्यांच्या संवेदनशीलता तरल बनविण्यासाठी शिबिरांमधील अनेक प्रसंगांचा उपयोग झाला.

**मातृभूमी परिचय शिबिराची उद्दिष्टे** -

1) मातृभूमीचा परिचय इ. 5 वी ते 10 वी पर्यंत टप्प्याटप्प्याने होणे.
2) मातृभूमीच्या विशालतेच्या, वैविध्याचा परिचय होणे.
3) विद्यार्थ्यांची वृत्ती घडण होणे.
4) विद्यार्थ्यांना समाज निरीक्षणाची दृष्टी मिळणे.
5) समाजामध्ये निःस्वार्थपणे काम करणाऱ्या व्यक्तींचा परिचय व त्यांच्याकार्याची पद्धत समजणे.
6) विविध प्रकारच्या साधनसंपत्तीचा परिचय होणे.
7) विद्यार्थ्यांची ग्रहणक्षमता वाढणे.
8) विद्यार्थी अंतर्मुख होणे.

**कृती संशोधनाच्या अभ्यासाची पद्धत** - या कृतीसंशोधनात अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक व सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला.

इ. 5 वी ते 10 वी पर्यंतची शिबिरे केलेले 5 विद्यार्थी 5 विद्यार्थीनी जे 10 वीत शिकत आहेत. त्यांच्या कडून प्रश्नावली भरून घेतली. प्रश्नावली प्रदीर्घ होती. काही मुलाखती घेतल्या, काही वृत्तांचा आधार घेतला.

मातृभूमीचा टप्प्याटप्प्याने परिचय या उद्दिष्टानुसार तालुक्यापासून देशाच्या सीमेपर्यंत असे विद्यार्थ्यांना अनुभव घेता आले. इ. 5 वी तालुका घोडेगाव, इ. 6 वी जि. रायगड मधील चोरोंडे या गावी इ. 7 वी विभागाच्या सीमावर्ती भागात म्हणजे नाशिक-निफाड येथे तर इ. 8 वीत असताना हे विद्यार्थी कार्यकर्ते म्हणून कार्यरत होते. इ. 9 वी मध्ये अंदमान बेटावर जाण्याचा अनुभव घेतला तर इ. 10 वी मध्ये अरूणाचल प्रदेशातील तवांग या ठिकाणी हे विद्यार्थी शिबिरासाठी जाऊन आले.

प्रश्नावली व अभ्यासातून दिसलेली निरीक्षणे -

1) इ. 5 वी ते 10 वी च्या शिबिरांमधून अनेक वेगवेगळी वैशिष्ट्ये सर्वांच्या स्मरणात आहेत.
2) मातृभूमीचा विविधांगी परिचय सर्वांनी करून घेतला.
3) श्रमदान, स्वावलंबन, सहविचार, जुळवून घेणे यामधून विद्यार्थ्यांची वृत्तीघडण होण्यास मदत झाली.
4) गावभेटी, कुटुंबभेटी अशा उपक्रमांमुळे गावातील समस्या समजण्यास व अपरिचित व्यक्तींचा परिचय होऊन स्नेह वाढण्यास मदत झाली.

5) शेती, शिक्षण, उद्योग, पत्रकारिता, न्याय, पर्यावरण इ. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचा परिचय झाला. त्यांच्या कार्याची पद्धत समजून घेता आली.

6) शिबिरठिकाणी झालेल्या विविध स्थळभेटींमधून साधनसंपत्तीचा परिचय झाला.

निष्कर्ष :-

विद्यार्थ्यांच्या मनात मातृभूमीविषयी आदर, कृतज्ञता, स्वाभिमान जागण्यासाठी या उपक्रमाचा निश्चितच उपयोग होतो. ही शिबिरे पाठ्यपुस्तकापलिकडे जाऊन प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण देण्यास उपयुक्त ठरतात. प्रवास, निवास, सहकार्य, सत्कार्य, स्वालंबन करण्याची संधी यातून मिळते. विद्यार्थ्यांना शहाणं करण्यासाठी या उपक्रमाचा चांगला उपयोग होतो.

'केल्याने देशाटन, पंडित मैत्री सभेत संचार
शास्त्रग्रंथ विलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार ।

ही उक्ती शालेय वयात या उपक्रमामधून अनुभवता येते.

**सौ. राजश्री अविनाश मराठे**
नवनगर विद्यालय,निगडी



# मातृभूमी परिचय शिबीर : एक अनुभव



## मातृभूमी परिचय शिबिर - पुणे

शासकीय वसाहत, वांद्रा, मुंबई येथील स्वामी विवेकानंद गुरूकुल- एक उपक्रमशील शाळा म्हणून या विभागात प्रासिद्ध आहे. 'गुरूकुल' हा उपक्रम पंचकोशावर आधारित आहे.आमच्या या उपक्रमशील शाळेत 'मातृभूमी परिचय शिबीर' हा उपक्रम आम्ही राबवितो.

या वर्षी दि.२८ऑक्टोबर ते दि३ नोव्हेंबर २०१४ या कालावधीत आमच्या गुरूकुल चे शिबीर 'पुणे' येथे योजण्यात आले होते.त्या शिबीरासंबंधी तसेच मातृभूमीचा परिचय या शिबीरातून विद्यार्थ्यांना कसा होतो.या विषयी थोडक्यात...................

- स्वत:च्या मातृभूमीचा जवळूनअनुभव घेणे.
- भूगोल, इतिहास, भाषा, लोकजीवन, सामाजिक प्राश्न, विविधता, भिन्न भाषा व वेश यांचा अनुभव व परिचय करून घेणे.
- परिसरातील डोंगर, दऱ्या, नदया, झाडे, फळे, फुले, पक्षी इ.पर्यावरणाशी निगडीत गोष्टींची माहिती करून घेणे.
- स्वयंशिस्त अंगीकारणे, साहस, स्वावलंबन व सहजीवनाचा अनुभव घेणे.
- अडीअडचणींवर मात करून परिस्थितीशी जुळवून घेणे.
- कर्तुत्ववान व्यक्तिंचा परिचय करून घेणे.
- क्षेत्रभेटीचे विचार पूर्वक व अभ्यासपूर्वक आकलन करून घेणे व नोंदी ठेवणे.

या आधीही आमच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील कराड, दापोली, कोसबाड, बदलापूर, अमरावती, नाशिक येथील शिबीरांचा अनुभव घेतलेला आहे.

शिबीर घेऊन जाणे ही साधी गोष्ट नाही.यासाठी पूर्वतयारीची आवश्यकता असते.

- सर्वात प्रथम गुरूकुलातील शिक्षक ज्या ठिकाणाला भेट दयायची आहे, तेथील प्रथम पाहणी करून येतात.
- ज्या प्रवासी साधनाने [रेल्वे, बस इ]प्रावास करणार आहोत त्या साधनांचे विद्यार्थ्याच्या मदतीने आरक्षण करतात.
- विद्यार्थ्याच्या मदतीने शिबीराची पूर्वकल्पना ज्या – ज्यासंस्था आपण पाहणार आहोत त्यांच्या जबाबदार व्यक्तिंशी पत्रव्यवहार करून लेखी संमती घेतात, ई मेल पाठवून त्याची पोच घेतात.

निवासाची सोय: ज्ञानप्राबोधिनी ही शाळा मुलींसाठी तर न्यू इंग्लिश स्कूल हे मुलांसाठी या दोन ठिकाणी निवासाची सोय करण्यात आली होती, यासाठी लागणारी परवानगी पत्रव्यवहार, दूरध्वनी व प्रत्यक्ष भेट यामार्फत घेतली गेली.

- दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे विद्यार्थ्यांचीसंघभावना वाढविणे: इ.५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांचे संख्येनुसार गट पाडून इ.९ वी च्या विद्यार्थ्यांवर  गटाची जबाबदारी दिली जाते.यामुळे सांघिक भावना वाढीस लागून जबाबदारीची जाणीव होते, सहकार्य, सहिष्णूता व परस्परावलंबन, स्वावलंबन, निर्णयक्षमता वाढणे, स्वत:वर संयम ठेवणे, इतरांची काळजी घेणे, अधिकाराचे उल्लंघन न करणे इ.गुणांचा विकास होतो.संपूर्ण शिबीरात प्रत्येकी एक दिवस एका गटावर नाश्ता, व्यायाम, उपासना, भोजन, क्रीडा, प्रवास, प्रथमोपचार, व्यक्तिपरिचय, मुलाखत घेणे इ.जबाबदा-या सोपविल्या जातात.

- शिबीराचा आणखी एक घटक म्हणजे श्रमदान: यात पुढील प्रकारची कामे विद्यार्थी स्वयंप्रेरणेने व आनंदाने करतात. उदा.राहतो त्या खोलीची स्वच्छता करणे.आवाराची / परिसराची स्वच्छता करणे.

स्वत:चे कपडे धुणे. पंगतीत वाढायला मदत करणे. इ.

याचा परिणाम असा होतो की, विद्याथ्र्यांना स्वयंशिस्त लागते, विद्यार्थी स्वावलंबन शिकतो, वेळेचे महत्त्व कळते व वेळेचे नियोजन व्यवस्थित असल्यावर काय फायदे होतात आणि नसल्यावर काय तोटा होतो, हे लक्षात येते.

या शिबिरात रोजचा दिनक्रमही आखलेला असतो. विद्यार्थी सकाळी लवकर उठतात,व्यायाम व सूर्यनमस्कार व उपासना करतात. त्यानंतर मॉर्निंग वॉक साठी जातात. या वर्षीचा हेरीटेज वॉक अविस्मरणीयच म्हणावा लागेल. कारण यावर्षी आमच्या सोबत दोन इतिहासप्रेमी,तज्ज्ञ होते.

श्री.मोहन शेटये सर – (हेरिटेज वॉक) सरांनी आम्हाला पुणे शहरातील १६ क्रांतिकारकांनी वास्तव्य केलेल्या वास्तूंची माहिती दिली.यात वासुदेव बळवंत फडके,लो.टिळक,सावरकर,सुभाषचंद्र बोस इ. क्रांतिकारकांच्या वास्तूंचा समावेश होता. लक्ष्मीनारायण मंदिर,भगतसिंग,सुखदेव,राजगुरू यांची भेट झालेले मुरलीधर मंदिर,पुरंदरे प्रकाशनाचा वाडा ज्या ठिकाणी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या निवासस्थानाबद्दल माहिती दिली. भारत इतिहास संशोधन मंडळास भेट दिली. शनिवार वाडा दाखविला. या हेरिटेज वॉकमध्ये क्रांतिकारकांच्या कथा, त्यांच्या जीवनातील रोमहर्षक प्रसंग कथन केले. त्यामुळे संपूर्ण इतिहास विद्यार्थ्यांच्या डोळया समोर उभा राहिला.



श्री.प्र.के.घाणेकर सर-स्वा. सावरकरांनी १९०५ ला ज्या ठिकाणी परदेशी कापडाची होळी केली ते स्थळ दाखविले व घटने विषयी माहिती दिली. लकडी पुलाचा इतिहास सांगितला. त्यानंतर मुठा नदीच्या पात्रातील नानासाहेब पेशव्यांची समाधी तसेच नारायणराव पेशव्यांची उद्ध्वस्त समाधी दाखवून त्यांच्या कार्याविषयी माहिती दिली.यानंतर ओंकारेश्वर मंदिराचा इतिहास, स्थापत्य, मूर्तीविज्ञान या दृष्टीकोनातून अंतरंग उलगडले, तसेच शनिवार वाड्याचा इतिहास, वास्तू अवशेष, त्यांची व त्यांची वैशिष्ट्ये सांगितली.शनिवारवाड्यात फेरफटका मारला.या वेळी पुण्यातील काही वैशिष्ट्य पूर्ण वनस्पतींचीही माहिती दिली.

या शिबिरात आम्ही काही ऐतिहासिक, भौगोलिक, वैज्ञानिक तसेच पुणे शहरातील काही ठिकाणांना भेटी दिल्या.

वैज्ञानिक ठिकाणे : विज्ञानाश्रम,पाबळ,सायन्स पार्क, IITM,आयुका

संस्था: नॅशनल डिफेन्स अॅकॅडमी (NDA),महात्मा फुले कृषी विद्यापीठ आर्ट गॅलरी,ज्ञान प्रबोधिनी.

ऐतिहासिक ठिकाणे : सिंहगड, पर्वती, शनिवार वाडा, राजा केळकर संग्रहालय, आगाखान पॅलेस, महादजी शिंदे छत्री, केसरी वाडा, दगडू शेठ हलवाई गणपती, लाल महाल, विश्रामबाग वाडा, चतु:शृंगी, पाताळेश्वर मंदिर, आंबेडकर संग्रहालय इ. पाहिले.

व्यक्ती परिचय—श्री मोहन शेटे, प्रा.प्रके.घाणेकर,अरविंद गुप्ता,के.एन.देसाई

अशा ह्या शिबीराचा दिनक्रम पूर्वनियोजित असतो.विद्यार्थी विविध ठिकाणांना भेटी देऊन संध्याकाळी जेव्हा स्वस्थानी परत येतात तेव्हा भोजन झाल्यानंतर झोपण्यापूर्वी आपापल्या गटात बसून दिवसभरातकेलेले चांगले काम,झालेल्या चुका यांचा आढावा घेतात.पाहिलेल्या ठिकाणांबद्दल चर्चा करतात व नोंद वहीत त्याची नोंद करतात. यानंतर दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाची रूपरेषा गटप्रमुख विद्यार्थ्यांना सांगतात. नंतर गटप्रमुख शिक्षकांबरोबर चर्चा करतात.यात अडचणी,तक्रारी यांचे निरसन,निराकरण केले जाते व सूचना दिल्या जातात. अश्या प्रकारे हे मातृभूमी परिचय शिबीर संपन्न होते व विद्यार्थी पुन्हा एकदा परतीच्या प्रवासाला सुरुवात करतात व स्वस्थानी परत येतात.

या पुढील शिबीरे केवळ महाराष्ट्रातच नाही तर इतरही राज्यात घेण्याचा आमचा मानस आहे. यातून विद्यार्थ्यांचा इतरांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलेल व त्यांचा सर्वांगीण विकास होईल यात शंकाच नाही.

धन्यवाद !

**श्रीम. सुहासिनी सुभाष गावडे**

(गुरुकुल प्रमुख)

महात्मा गांधी विद्यामंदिर,वांद्रे (पू)

मु – ५१

माझी शोधयात्रा तसं पाहिलं तर 'मणिपूरच्या शोधयात्रे'च्या आधीच सुरु झालेली.मोठ्या पगाराची कॉर्पोरेट क्षेत्रातील माझी नोकरी सोडून,१ जून २०१२ पासून,एक वर्ष माझ्या शोधयात्रेसाठी व्यतीत करायचे ठरवले.ज्ञानाच्या विविध क्षेत्रांमध्ये काम करून बघणे, भारतातील अनेक दुर्गम,मागासलेल्या,अशांत भागांमध्ये काम करून बघणे,काही व्यावसायिक तर काही स्वेच्छेने स्वयंसेवी काम करणे-असे वेगवेगळे प्रयोग करून आपल्याला आयुष्यात काय केल्याने अधिक समाधानी वाटेल याचा शोध घेणे हे माझ्या शोधयात्रेचे माझ्या मनातील स्वरूप होते आणि बऱ्याच प्रमाणात ते यशस्वी झाले देखील.

'मणिपूरची शोधयात्रा' हा त्यातीलच एक प्रयोग.छत्तिसगढमधील नक्षलवादी दंतेवाड्यामध्ये घेतलेले विज्ञान -शिबिर, पुण्यातील महानगरपालिकेच्या शाळांमध्ये चालवलेले सायन्स क्लब ,अरुणाचलमधील आदिवासी मुलांसाठी घेतलेला इंजिनियरिंग प्रवेश परिक्षेचा वर्ग लेह –लडाख मध्ये जावून तिथल्या शाळांमध्ये घेतलेली विज्ञान-शिबिरे अशा अनेक गोष्टी या वर्षामध्ये केल्या. त्या सर्वांविषयी experimentswithsciencewordpress.com या ब्लॉगमध्ये मी लिहिले आहे.

त्यामुळे,अशा माझ्या शोधवर्षामध्ये'मणिपूरच्या शोधयात्रे'ला जावे का,हा निर्णय घ्यायला मला फारसा वेळ लागला नाही. ज्ञानप्रबोधिनीचा माजी विद्यार्थी असलेल्या माझ्या XLRI मधील मित्राकडून,गौरवकडून,मला जेव्हा शोधयात्रेबद्दल कळाले,तेव्हा याचवर्षी शोधयात्रेला जायचे हे मी नक्की केले.गौरव स्वत: दोनदा शोधयात्रेला जावून आलेला आहे. गौरवची इमेल मी कल्याणीला फॉरवर्ड केली,तिने तिच्या काही मित्रमैत्रीणीना पुढे फॉरवर्ड केली आणि आमचा नऊजणांचा गट शोधयात्रेला जाण्यासाठी तयार झाला.

'सृष्टी'(SRISTI– Society for Research & Intiatives for Sustainable Technologies & Institutions) या अहमदाबादमधील संस्थेमार्फत शोधयात्रा वर्षातून दोनदा आयोजित केली जाते.आम्ही नऊ जणांनी रीतसर 'सृष्टी'ला अर्ज पाठवले आणि आम्हा सर्वांचीच शोधयात्रेसाठी निवड झाली. आम्ही सर्वजणच या-ना-त्या प्रकारे चाकोरीबाहेरील कामांची आवड असलेले आणि अशी कामे करण्याचा आपापल्या परीने मनापासून प्रयत्न करणारे होतो.



मल्टीनॅशनल कंपन्यांमध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर असलेल्या आणि अवांतर वेळेत विज्ञान-शिक्षणासंबंधी कामकरणाऱ्या कल्याणी आणि स्नेहा, अर्थशास्त्र शिकलेला, शेतीविषयक संशोधन आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काम करणारा तन्मय,पर्यावरणशास्त्रातील सल्लागार म्हणून काम करणारा राहुल,जैवविविधतेचा अभ्यास केलेली स्मिता, संघटनात्मक वर्तन या विषयात संशोधन करणारी मधु आणि मी असा आमचा कंपू शोधयात्रेसाठी तयार झाला. दुर्दैवाने काही कारणांमुळे आमची एक मैत्रिण आणि स्वत: गौरवच आमच्या बरोबर येवू शकले नाहीत.

शोधयात्रा ही नुसती फिरण्यासाठी आणि मौज-मजा करण्यासाठी नाही,याची आम्हा सर्वांना पूर्ण जाणीव होती. शोधयात्रेतील हालअपेष्टा,शोधयात्रेमध्ये करायच्या कामाचे महत्व आणि गांभीर्य याची माहिती आम्हाला सृष्टीची वेबसाईट बघून मिळाली होती. जाण्याआधी वेळ घेऊन आम्ही सर्वजण ईशान्यभारतामध्ये अनेक वर्षे काम केलेल्या ज्ञानप्रबोधिनीच्या पोंक्षेसर आणि प्रशांतसर यांना भेटलो.त्यांनी आम्हाला ईशान्यभारतातील मणिपूर राज्यातील जीवनमान,त्या भागाचा भौगोलिक व सांस्कृतिक आढावा या अनुशंगाने मार्गदर्शन केले. 'सृष्टी'ने आयोजित केलेल्या १२ जानेवारी ते १७ जानेवारी २०१३ दरम्यानच्या मणिपूर राज्यातील चूराचंद्रपूर जिल्ह्यातील शोधयात्रेसाठी आम्ही सर्वजण तयार झालो.

सृष्टी या संस्थेमार्फत दरवर्षी दोन शोधयात्रा आयोजित केल्या जातात. या शोधयात्रांचा उद्देश भारतातील दुर्गम,अशांत वा पिडीत भागांमध्ये जावून पिढीजात चालत आलेले ज्ञान,सर्जनशीलता,नवकल्पना (Innovations) यांचा शोध घेणे असा असतो. दुर्गमभागातील नैसर्गिक आपत्ती आणि हालअपेष्टा यांच्यामधूनच सर्जनशीलतेला आणि नवकल्पनांना प्रोत्साहन मिळते,असे 'सृष्टी' संघटनेचे मत आहे वर्षानुवर्षे चालत आलेले पिढीजात ज्ञान आणि सर्जनशील नवकल्पना यांचे संकलन करून राष्ट्रीयपातळीवर ते उपलब्ध करून देणे,अभिनव उपक्रम वा उपकरणे विकसित केलेल्या व्यक्तींचा सन्मान करणे,त्यांचे हे ज्ञान आणि नवकल्पना यांचा शोधयात्रांमार्फत देशभर प्रसारही करणे (Cross-pollination of ideas),हे अशा शोधयात्रांमधून साद्य केले जाते.

१९९८ सालापासून सुरु झालेल्या या शोधयात्रा 'सृष्टी'मार्फत वर्षातून दोनदा काढल्या जातात. एक उन्हाळयात आणि एक हिवाळयात.उन्हाळयातील शोधयात्रा ही उष्ण प्रदेशांमध्ये तर हिवाळयातील शोधयात्रा ही शीतप्रदेशांमध्ये काढली जाते.

दुर्गमभागातील जीवनमान आणि हाल अपेष्टा समजून घेण्यासाठीच केलेले हे नियोजन आहे.

या वर्षीची शोधयात्रा १२ जानेवारीला मणिपूरमधील चूराचंद्रपूर जिल्ह्यात सुरु झाली. Sang Ga Maun Inn (SMI) या बिजांग गावामधील स्वयंसेवी संस्थेमध्ये आम्ही शोधयात्री जमलो. मणिपूर राज्याच्या डोंगराळ भागातील चूराचंद्रपूर हा जिल्हा.इथे प्रामुख्याने कुळी या आदिवासी जमातीचे वास्तव्य असते.

बिजांगमध्ये आमचा गट थोडा लवकर पोहोचला होता.१२ तारखेला शोधयात्रेच्या उद्धाटन समारंभाची तयारी चालू होती. ईशान्येकडे सूर्यास्त थोडा लवकरच होतो. संध्याकाळी ५.३० पर्यंत पूर्ण अंधार झाला होता. बहुतेक सर्व शोधयात्री आणि गावातील प्रतिष्ठित व्यक्ती आल्यावर उद्धाटन सोहळा सुरु झाला. शोधयात्रेबद्दल माहिती,गावातील प्रमुख व्यक्तींचे भाषण,लहान मुलांचे विविध-गुणदर्शनाचे काही कार्यक्रम आणि आम्हा सर्वांचे मणिपुरी शाल देवून केलेले प्रेमळ स्वागत असे त्या कार्यक्रमाचे स्वरूप होते.

ईशान्य भारतात जानेवारी महिन्यात भरपूर थंडी असणार हे माहितच होते. तरीही,मोठ्या हॉलमध्ये स्लिपिंग बॅगेमध्ये कुडकुडत झोपणं थोडं अवघडच गेलं.सकाळी उठून गरम चहा आणि नाष्टा चालू असतानाच एका हॉलमधून आवाज आला म्हणून तिथे डोकावलो,तर प्रोफेसर अनिल गुप्ता मुलांना गोळा करून त्यांची कल्पना स्पर्धा (idea competition) घेण्यात मग्न होते. IIM अहमदाबादचे प्राध्यापक आणि National Innovation Foundation चे अनिल गुप्ता हे एका अर्थाने शोधयात्रेचे सर्वेसर्वा मुलांमध्ये समरस होवून प्रोफेसर अनिल गुप्ता ही कल्पना -स्पर्धा सर्व गावांमध्ये घेतात. मुलांना त्यांच्या कल्पनाविश्वामध्ये भरारी मारण्याचे प्रोत्साहन देण्याची प्रोफेसरांची हतोटी थक्क करणारी आहे. दैनंदिन जीवनातील समस्यांवर कल्पकतेने काढलेले तोडगे लिहिण्याची ही स्पर्धा. मुलांना आधीच्या अभिनव,नाविन्यपूर्ण कल्पनांची माहिती देवून त्यांच्या नवीन कल्पना मांडण्यासाठी प्रो.गुप्ता प्रोत्साहित करतात. प्रो. गुप्तांचा एकंदर उत्साहच संसर्गजन्य आहे. सर्व शोधयात्री मनापासून सहभागी होवून जातात. मुलांच्या सर्व कल्पनांची नोंद ठेवली जाते. अभिनव कल्पनांना बक्षिसेही दिली जातात.काही अभिनव कल्पनांचे नंतर प्रत्यक्ष नमुने बनवून ज्या मुलाची ती कल्पना आहे तिला/ त्याला ते पाठवले जातात,काहींचे तर पेटंट त्या मुलाच्या नावावर रजिस्टर केले जाते.

कल्पना-स्पर्धा संपल्यावर आम्ही सर्व शोधयात्री पुढच्या गावाकडे जायला निघालो.जड सामान नेण्यासाठी एक ट्रक होता. बाकीचे सामान पाठीवर टाकून दुसऱ्या गावाकडे चालत जायचे असते. पूर्ण शोधयात्रा पायी केली जाते आम्ही रोज जवळजवळ १०-१५ किमी चालायचो.

आम्ही सर्वजण मिळून जवळजवळ पन्नास एक शोधयात्री होतो. सुरवातीपासून शोधयात्रांमध्ये सहभागी होणारे गुजराथी शेतकरी,फ्रेंच स्त्री-पत्रकार आणि तिची मुलगी,दिल्लीत येवून स्थायिक झालेली आणि स्वयंसेवी संघटनेमध्ये काम करणारी जपानी स्त्री, प्रो.गुप्तांबरोबर Ph.D चा अभ्यास करण्यासाठी भारतात आलेली जर्मन मुलगी,भारतभरातील अनेक स्वयंसेवी संघटनांमध्ये काम करणारे लोक, असे विविध प्रकारचे लोक शोधयात्रेमध्ये सहभागी झाले होते. स्वत: प्रो.अनिलगुप्ता हे गांधीवादी विचारांचे आणि भारतातील तळागाळातील अभिनव नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी,त्यांचा प्रसार करण्यासाठी SRISTI, National Innovation Foundation आणि Honey Bee Network यांच्या माध्यमातून झटणारे आहेत.

प्रत्येक गावामध्ये शोधयात्री येणार याची पूर्वकल्पना दिली होती. चूराचांदपूर जिल्हाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत शोधयात्रा ठरलेली होती. प्रत्येक गावी आमचे मनापासून स्वागत,स्वागतासाठी स्थानिक पेय किंवा वेगळयाच प्रकारचा चहा बनवलेला असायचा. अनेक गावकरी जमा झालेले असायचे.आमची बसायची आणि कार्यक्रमाची चांगली सोय केलेली असायची. आम्ही तिथे पोस्टर्स लावायचो,बरोबर आणलेल्या अभिनव उपक्रमांची प्रात्यक्षिके दाखवायचो.मुलांची कल्पना-स्पर्धा घ्यायचो. गावकऱ्यांना त्यांचा विविध नवकल्पना,अभिनव उपक्रम यासंदर्भात माहिती विचारून त्याची नोंद करायचो.पिढीजात चालत आलेले ज्ञान,स्थानिक औषधी वनस्पती यासंदर्भात माहिती विचारायचो,शेतकऱ्यांकडून सेंद्रिय शेतीच्या स्थानिक पद्धतींविषयी माहिती घ्यायचो,गावातील वृद्ध व्यक्तींचा सन्मान करायचो.प्रत्येक गावामध्ये सर्वांच्या खाण्याची आणि कम्युनिटी हॉल किंवा शाळेमध्ये रहाण्याची सोय गावकऱ्यांनी केली होती.

शोधयात्रेचा प्रवास खूपच नाविन्यपूर्ण होता. खूप प्रेमाने आदरातिथ्य करणारे लोक भेटले.त्यांच्याशी झालेल्या संवादातून आणि इतर शोधयात्रीबरोबर झालेल्या संवादातून खूप काही शिकायला मिळाले. प्रो.अनिल गुप्ता आम्हाला म्हणाले होते की या शोधयात्रेत तुमचे चार गुरु असतील-गावांमधील लोक,इतर शोधयात्री,निसर्ग आणि तुम्ही स्वत:.निसर्गाशी होणारा संवाद आणि स्वत:शी होणारा संवाद हा माझ्यासाठी खूप महत्वपूर्ण होता.

१७ जानेवारीच्या सकाळी,खरं तर १६ जानेवारीच्या रात्री (ही संपूर्ण रात्र थंडीमुळे आम्ही शेकोटी शेजारी बसून होतो) शोधयात्रेची सांगता झाली,या रात्री आम्ही शोधयात्रीनी आपापले अनुभव सांगितले,एकंदरीतच शोधयात्रेविषयी आणि पुढील टप्प्यावर करायच्या कामाविषयी प्रदीर्घ चर्चा केली. मला स्वत:ला या शोधयात्रेचा कालावधी थोडा कमी वाटला. ईशान्य भारतातील निसर्गाला मनापासून अनुभवण्यासाठी मणिपूरच्या दूर्गम डोंगराळ भागातील जीवनमान अधिक जवळून समजून घेण्यासाठी,दूर्गम आदिवासी भागांमधील जीवनाच्या वेगवेगळया क्षेत्रातील समस्या व त्यावरील अभिनव नवकल्पनांद्वारे केलेले काही उपाय यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी,त्याची व्यवस्थित नोंदकरण्यासाठी अधिक सुसंघटीतपणे काम करणे आणि अधिक काळ व्यतीत करणे आवश्यक होते असे वाटले.

मी ज्या स्वयं-शोधासाठी आलो होतो त्यासाठी तर या पाच दिवसांमध्ये खूपच कमी वेळ मिळाला.खरं तर,हा स्वयं-शोध ही खूप दूरगामी प्रक्रिया आहे,ही महत्वपूर्ण जाणीव मला या शोधयात्रेत झाली आणि आयुष्य हीच एक शोधयात्रा म्हणून जगत रहायचे या विचारातून एक न संपणारी शोधयात्रा सुरु झाली.

**सुगट दाभोलकर**

सातारा

*" Inspire. And get inspired.*

*Change. And lead change in others.*

*Learn. And share your life's lessons.*

*Build and help build India through Enterprise*

*Discover India and a new Indian inside you*

*All outside the comfort of your homes, in a moving train across India "*

A train filled with 450 youngsters journeys 8000 kms across 12 locations and 2 weeks to discover the heart of enterprise in India.

Jagriti Yatra is a 15-day long, national train journey that will take you 8000 kilometers across the length and breadth of India, to understand and build the India of smaller towns and villages through enterprise. The concept of nation-building is central. The concept comes from the Azad Bharat Rail Yatra launched n 1997, on the 50th anniversary of India's Independence. It was ten years later that Jagriti Yatra was developed, with core team members from the 1997 Yatra, and with a greater focus on social enterprise.

Participants meet role models, change-makers, leaders that started out on a journey – and made a difference to thousands of lives. Participants interact with role models who are building India through enterprise; through them participants find inspiration to undertake their own building journey.

The Jagriti Yatra is a two-week train journey to discover social enterprise in India.

Though the length and scale of this journey is one key aspect of this ambitious project – in fact, the longest journey, with the most participants, of any journey of its kind anywhere in the world – the innovation doesn't stop there. Yatris de-train at each location and meet with key role models representing different sectors of development through enterprise such as health, education, and agribusiness. They also sit in on panels that give panoramic views of the specified sector, complementing each role model's personal and organizational story.

## Vision

The vision of Jagriti is 'building India through enterprise'. It aims to inspire the young Indians living in the middle of the Indian demographic diamond to lead development by taking to enterprise, thus unleashing a movement of Enterprise-led-development. Jagriti focuses on the seven verticals of development Agriculture

1. Education
2. Energy
3. Healthcare
4. Manufacturing

## Jagriti Yatra Impact

Bringing about behavioural and thought level changes in people is quite a challenging job. In Jagriti Yatra the impact is massive and deep. We at GOONJ have seen this first hand with the Yatris. There is a vast change in their vision, thoughts and behaviour after the Yatra. The Jagriti Yatra, to me is a source of energy and inspiration, from the brightest 400 youth from all over the country.

Anshu Gupta Founder, Goonj

Jagriti Yatra is focused on the adaptation and replication of successful enterprise models across India. The concept of nation-building is central @ Jagriti Yatra.

## To read in details Visit

http://www.jagritiyatra.com/about

http://www.thealternative.in/business/jagriti-yatra-a-train-to-discover-the-heart-of-indian-social-enterprise/

https://www.youtube.com/watch?v=spT7e1XdTuY

https://www.youtube.com/watch?v=akejS9nCiDE

https://www.youtube.com/watch?v=sP3y7pwcd5E

https://www.youtube.com/watch?v=oD6BhGWakzE






## Website Links

### मातृभूमी परिचय : भारत दर्शन

1. IAS Bharat Darshan Tour

https://www.youtube.com/watch?v=3kaAlKH1Btc
https://www.youtube.com/watch?v=8B42YZqdxEU

2. Incredible India 2014-Swami Vivekananda Bharat Yatra (SVBY)

https://www.youtube.com/watch?v=8G7TOk3EvLM

3.Shodh Yatra

https://www.youtube.com/watch?v=iOeabGcH6_E

4.Shodh yatra : an Indian micro-finance journey

https://www.youtube.com/watch?v=JVxcqlsGeyA

5. And the answer is

https://www.youtube.com/watch?v=5xBaUtA8Sck

**Pareevrajak :**
**One who wanders from place to place in search of truth**




## ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र

पत्ता : 'विनायक भवन', ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

दूरभाष : २४२०७१९३, २४२०७१९४

ई - मेल : erc@jnanaprabodhini.org

Visit us at : **www.erc-pune.org**